


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




सिटी डिजिटल केबल नेटवर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक, बुलढाणा

संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे    अंक : ७३९. वा    रविवार    दि. १४ एप्रिल २०२४    पृष्ठ ८    किंमत ३रुपये

# केंद्रीय माहिती आयोगाची निवडणूक आयोगाला नोटीस इव्हीएम-व्हीव्हीपीएटीशी संबंधित आरटीआयला प्रतिसाद दिला नाही

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

केंद्रीय माहिती आयोगाने (सीआयडी) निवडणूक आयोगाला (इ.सी) नोटीस पाठवली आहे. सीआयसीने निवडणूक आयोगावर कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप करत उत्तर मागितले आहे. खरं तर, देशातील काही प्रतिष्ठित व्यक्तींनी आरटीआय दाखल केला होता, ज्यामध्ये निवडणुकीदरम्यान ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी मशीनच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. आयोगाने ३० दिवसांनंतरही या आरटीआयला प्रतिसाद दिला नाही, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पहिले अपील-ही ऐकले नाही, त्यावर सीआयसीने नाराजी व्यक्त केली. देवसहायम यांनी २०२२ मध्ये आरटीआय दाखल केला होता माजी भारतीय प्रशासकीय सेवा (आय.ए.एस) अधिकारी एमजी देवसहायम यांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र ईव्हीएम, व्हीव्हीपीएटी आणि मतमोजणी प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर याचिका दाखल केली होती. माहितीचा अधिकार (आरटीआय) कायद्यांतर्गत निवडणूक आयोगाकडे अर्ज केला आणि त्यावर केलेल्या कारवाईचा तपशील मागवला. २ मे २०२२ रोजी निवडणूक आयोगाकडे निवेदन पाठवण्यात आले. २२ नोव्हेंबर २०२२ रोजी दाखल केलेल्या आरटीआयद्वारे, देवसहायमना त्या व्यक्ती आणि सार्वजनिक न्यायाधिकरणांबद्दल जाणून घ्यायचे होते ज्यांना सर्व फायली आणि कोणत्याही बैठकीचे तपशील पाठवले गेले होते. मतदान पॅनेलकडून प्रतिसाद न मिळाल्यानंतर, देवसहायम यांनी सीआयसीकडे दुसरे अपील केले. मुख्य माहिती आयुक्त हिरालाल समरिया यांनी विचारणा केली असता, देवसहायम यांना उत्तर का देण्यात आले नाही, याचे उत्तर निवडणूक आयोगाचे केंद्रीय जन माहिती अधिकारी देऊ शकले नाहीत. ते म्हणाले की, जर इतर लोकही चुकांसाठी जबाबदार असतील तर सीपीआयओ त्यांना आदेशाची प्रत देईल आणि अशा लोकांच्या लेखी सबमिशन सीआयसीकडे पाठवाव्यात. सामरिया यांनी निवडणूक आयोगाला आरटीआय अर्जावर ३० दिवसांत उत्तर देण्याचे निर्देशही दिले आहेत. प्रख्यात तांत्रिक व्यावसायिक, शिक्षणतज्ज्ञ, निवृत्त आयएएस, आयपीएस आणि आयएफएस अधिकारी, माजी नागरी सेवक, ज्यात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) आणि इंडियन इन्स्टिट्यूट




ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) च्या प्राध्यापकांचा समावेश आहे, यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केला होता. ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी मशीन.. २ मे २०२२ रोजी निवडणूक आयोगाला लिहिलेल्या पत्रात या लोकांनी लिहिले होते - या ज्ञापनाद्वारे आम्ही निवडणूक आयोगासमोर काही गोष्टी मांडू इच्छितो ज्याचा भारताच्या निवडणूक लोकशाही म्हणून अस्तित्वावर परिणाम होतो. प्रत्येक विलसाठी इसीआय कडे अपील करा तात्काळ प्रतिसादाची अपेक्षा.




शुभेच्छुक :
इंडियनऑयल IndianOil
मे.हिरोळे इण्डेन
डॉ.शिंगणे कॉम्पलेक्स,साने नगर,तहसिल चौक
बुलडाणा
मे.हिरोळे पेट्रोलियम
जयस्तंभ चौक,अजिंठा रोड, बुलडाणा

# बाबासाहेबांच्या जीवनातील एक अविस्मरणीय घटना...

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बी. ए. ची परीक्षा पास झाले. बी. ए. झाल्यावर सयाजीराव गायकवाड यांनी भीमरावाची बढौदा या आपल्या संस्थानात सैन्याचे लेफ्टनंट म्हणून नेमणूक केली. परंतु ही नोकरी भीमरावांचे वडील सुभेदार रामजीबाबा यांना पसंत नव्हती भीमरावांने मुंबईतच रहावे अशी त्यांची इच्छा होती.**





त्यांनी आपल्या मुलाचे मन वळविण्याचा खूप प्रयत्न केला परंतु भीमरावांनी आपला हट्ट सोडला नाही. कारण सयाजीरावांनी त्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत केली होती. महाराजांचे है ऋण फेडण्यासाठीच भीमरावांनी त्यांची नोकरी पत्करली होती. भीमरावांच्या वडिलांनी आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी खूप खस्ता खाल्ल्या होत्या. डोळयात तेल घालून ते आपल्या मुलाच्या विद्याभ्यासासाठी रात्र रात्र जागे राहत असत अभ्यास संपवून मुलाच्या डोळ्यात झोप यायला लागली की ते झोपत असत. इतकेच नव्हे तर मुलाला त्याच्या आवडीचे पुस्तक विकत घेऊन देण्यासाठी रामजीबाबांनी आपल्या मुलीचे दागिने सोनाराकडे गहाण ठेवून भीमरावांना पुस्तक विकत घेऊन दिले. अशा आईप्रमाणे प्रेम करणाऱ्या वडिलांना सोडून भीमराव हे आपल्या लेफ्टनंटच्या नोकरीवर रुजू होण्यासाठी बडोद्याला रवाना झाले. इकडे मुंबईला त्यांच्या पिताजींनी त्यांचा ध्यास घेतला. भीमराव बडोदा सरकारच्या नोकरीवर रुजू झाले. परंतु ती नोकरी नव्हती तर सुळावरची पोळी होती. अस्पृश्यतेच्या मुताने तेथे सुद्धा त्यांचा मानभंग आणि छळवाद मांडला. ते एक वरिष्ठ अधिकारी या उच्च पदावर नोकरी करीत असूनदेखील त्यांच्या हाताखालच्या तथाकथित स्पृश्य नोकरांकडून त्यांना पदोपदी माणूसघाणी वागणूक मिळत होती अस्पृश्यतेचा शिक्काच जणूकाय कपाळावर असल्यामुळे तिथले सारेच कर्मचारी त्यांच्याशी लांबून आणि जपून व्यवहार करीत असत. एक साधा शिपाईसुद्धा जातीयतेच्या अहंकाराने दूर उभा राहून त्यांना लागणाऱ्या फाईली भीमरावांच्या टेबलावर फेकून देत असे ह्या असल्या माणूसकीहीन वागणुकीने भीमरावांच्या मनात घृणा निर्माण झाली होती, नव्हे तर चिडीचा आगडोंब त्यांच्या मनात घुमसत होता.अशा भयानक अवस्थेत नौकरी करीत असतानाच एवढ्यातच त्यांचे पिताजी मुंबईला अत्यावस्थ असल्याची तार त्याच्या हातात पडली ती तार वाचून भीमराव बेचैन झाले सतत मायेची पाखर घालणारा पिता असा अस्वस्थ असल्यावर कोणत्या सुपुत्राला चैन पडेल? घाईघाईनेच भीमराव स्टेशनवर आले आणि त्यांनी मुंबईला जाणारी पहिली गाडी पकडली आपल्या आजारी असलेल्या पित्याला भेटण्याची त्यांना घाई झाली होती. गाडीत बसल्यावर त्यांच्या डोक्यात विचार आला की, एवढ्या लांबून आपण वडिलांचे भेटीसाठी जाणार, तेव्हा त्यांच्यासाठी आपण काय बरे न्यावे? इतक्यात त्यांना आठवले की, आपण आपल्या पित्यासाठी सुरतेची बर्फी आणि खारीन्यावी, असा विचार त्यांनी आपल्या मनात पक्का केला.गाडी सुस्त स्टेशनवर येवून ठेपली. गाडी थांबताच भीमराव बर्फी आणि खारी दुकानातून घेण्यासाठी गाडीतून फलाटावर उतरले मिठाईवाल्या भोवती गिऱ्हाईकांची बरीच गर्दी जमलेली होती भीमरावांनी गर्दीतून वाट काढून कशीबशी मिठाई घेतली आणि ते लगबगीने गाडीत बसण्यासाठी गाडीकडे येवू लागले पण त्याचवेळी मुंबईची गाडी सुरत स्टेशनमधून बाहेर पडली आणि भीमराव हे सुरत स्टेशनच्या फलाटावरच राहिले. ती गाडी निघून गेल्यानंतर मुंबईला जाणारी दुसरी गाडी सुरत स्टेशनवर येण्याची शक्यता नव्हती गाडी चुकल्यामुळे भीमरावांना चुटपुट लागली. पण आता इलाज नव्हता. दुसऱ्या दिवशीपर्यंत थांबण्याशिवाय पर्याय नव्हते शेवटी ते रात्रभर स्टेशनवर थांबले. भीमराव दुसऱ्या दिवशी मुंबईला पोहोचले तेव्हा बराच उशीर झालेला होता. त्यांचे पिताजी रामजीबाबा हे मृत्यूशय्येवर शेवटची घटका मोजीत निपचित पडलेले होते. त्यांचे लक्ष भीमरावांच्या मार्गाकडे लागलेले होते. त्यांच्या बिछान्याभोवती शेजारी पाजारी म्लान चेहऱ्याने उभे होते आपल्या लाडक्या लेकाला शेवटचे डोळे भरून पाहण्यासाठीच त्यांचा जीव घुटमळत होता भीमराव आल्याचे पाहताच रामजीबाबांचा चेहरा फुलला त्यांचे डोळे पाण्याने भरले. आपल्या थरथरता हात त्यांनी भीमरावाच्या पाठीवरुन फिरवला आणि त्यांनी आपले डोळे मिटले.अशी ही जगावेगळी पिता-पुत्राची जोडी होती त्यांच्या अमरप्रेमाची कहाणी इतिहासकारांनी सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवलेली आहे बाबासाहेबांच्या जयंतीदिनी त्यांच्या पावन स्मृतीस आमचे विनम्र अभिवादन....

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर साक्षात प्रज्ञासूर्य...

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर है साक्षात प्रज्ञासूर्य होते. त्यांच्या तेजस्वी प्रकाशाने अवघ्या दीन-दलितांची मनं उजळून निघाली. आम्हीही माणसं आहीत, आम्हालादेखील इतरांप्रमाणे स्वाभिमानाने जीवन जगण्याचा हक्क आहे अशी उर्मी बाबासाहेबांनी दलितांमध्ये निर्माण केली. अशा या महामानवाच्या जीवनात असंख्य स्फूर्तीदायी घटना घडलेल्या आहेत. त्या घटनापैकीच एक हृदयस्पर्शी घटना बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त सादर करीत आहे**

# सत्यशोधक चित्रपटाचे निर्माता सुनील शेळके यांना सत्यशोधक पुरस्कार!



**जनसंचलन/बुलढाणा**

क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित सत्यशोधक चित्रपटाचे निर्माता तथा अभिता कंपनीचे सीईओ सुनील शेळके यांना सत्यशोधक पुरस्कार देण्यात आला आहे. येथील द्वारका हॉटेलच्या सभागृहात १२ एप्रिल रोजी हा पुरस्कार वितरण समारंभ झाला. त्यांच्यावतीने वडील भाऊसाहेब शेळके यांनी हा पुरस्कार स्वीकारला. महात्मा फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती बुलढाणा शहराच्या वतीने विविध क्षेत्रात कार्यरत ११ व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव केला. यामध्ये सत्यशोधक चित्रपटाचे निर्माता सुनील शेळके यांना सत्यशोधक हा विशेष पुरस्कार देण्यात आला आहे. सुनील शेळके यांनी प्रशासकीय सेवेत आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. उपजिल्हाधिकारी पदावर असतांना स्वेच्छानिवृत्ती स्वीकारुन त्यांनी अभिता कंपनीची स्थापना केली. अभिता फिल्म्सअंतर्गत त्यांनी चित्रपट क्षेत्रात पाऊल ठेवले आहे. सत्यशोधक चित्रपट देश, विदेशात प्रदर्शित झाला. प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या चित्रपटाला मिळाला. शिक्षणाची गंगा सर्वसामान्यांपर्यंत पोहचवून त्यांच्या जीवनाचे कल्याण करणारे महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांचे विचार चित्रपटाच्या माध्यमातून सुनील शेळके यांनी तळागाळात पोहचवले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महात्मा फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीने त्यांना सत्यशोधक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी कामगार न्यायालयाचे न्यायाधीश अजयकुमार मगरे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव न्यायाधीश हेमंत भुरे, उत्सव समितीचे अध्यक्ष आशिष लहासे यांची उपस्थिती होती.

# मालवाहू ट्रकची कारला जबर धडक, दोघे जखमी ट्रकचालक वाहनासह फरार...




**जनसंचलन/मानेगाव**

पूर्णा नदीच्या पुलाजवळ एका वळणावर ११ एप्रिलच्या रात्री एका भरधाव ट्रकने कारला जोरदार धडक दिल्याने दोन जण जखमी झाले. ट्रकचालक वाहनासह फरार झाला आहे. जळगाव जामोदकडून येणाऱ्या एमएच ४६ एच ११७१ क्रमांकाच्या ट्रकने नांदुराहून मानेगावकडे जाणाऱ्या एमएच २८ बीक्यू ७७३४ क्रमांकाच्या कारला धडक दिली. या धडकेत कारचालक सुनील अढाव, सागर जाणे जखमी झाले. अपघातानंतर ट्रकचालक वाहनासह फरार झाला. मात्र ट्रकची नंबरप्लेट कारमध्ये अडकली, त्यावरून पुढील तपास जळगाव जा. पोलिस स्टेशनचे ठाणेदार आनंद महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार अतुल मोहाडे करीत आहेत. गेल्या तीन दिवसापासून जिल्ह्यात अपघाताची मालिका सुरू आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य मोटरसायकल रॅली संपन्न

## १४ एप्रिल रोजी निघणाऱ्या शोभायात्रेत जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे अध्यक्ष राहुल कासारे यांचे आव्हान...

**जनसंचलन/बुलडाणा**

राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती राज्यातच नव्हे तर संपूर्ण जगात मोठे उत्साहाने साजरी करण्यात येते. बुलढाणा शहरात राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने साजरी करण्यात येत आहे. ११ एप्रिल पासून बुलढाणा शहरातील गांधी भवन येथे विविध कार्यक्रम घेण्यात येत आहे. आज १३ एप्रिल रोजी गारडगाव येथून धम्मा ज्योत घेऊन प्रारंभ करण्यात आली आहे. तर बुलढाणा शहरामध्ये



सकाळच्या सुमारास गांधी भवन जयस्तंभ चौक येथून भव्य मोटरसायकल रॅलीला सुरुवात झाली. मार्केट लाईन जनता चौक कारंजा चौक व परत गांधी भवन येथे या रॅलीचा समारोप झाला.





राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष राहुल कासारे यांनी सिटी न्यूजशी बोलताना सांगितले. १३ एप्रिल रोजी सुप्रसिद्ध गायक तसेच युवा रॉकस्टार राहुल साठे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम गांधी भवन येथे आयोजित केला आहे तरी सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे. १४ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास भीम पाळणा याठिकाणी संपन्न होणार आहे व समता सैनिक दल व माजी सैनिकांच्या वतीने मानवंदना देण्यात येणार आहे. व सायंकाळी चार वाजेच्या सुमारास भव्य अशी शोभायात्रा काढण्यात येणार आहे तरी या शोभे यात्रेत सर्व जनतेने बुलढाणा शहरवासीयांनी या शोभे यात्रेत उपस्थित रहावे असे आव्हान राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष राहुल कासारे यांनी केले आहे.




## खा.प्रतापराव जाधव साहेब यांच्या प्रचारार्थ आमदार गायकवाड यांचे नेतृत्वात काढण्यात आली प्रचार रॅली



**जनसंचलन/बुलडाणा**

लोकसभेचे शिवसेना भाजपा महायुती तसेच मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार लोकप्रिय खासदार भूमिपुत्र प्रतापरावजी जाधव साहेब यांच्या प्रचारार्थ आज दिनांक १३ एप्रिल २०२४ रोजी बुलढाणा शहरातील एकता नगर येथील श्री हनुमान मंदिर संस्थान येथून बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार धर्मवीर श्री संजय गायकवाड यांच्या नेतृत्वामध्ये नारळ फोडून सुरुवात करण्यात आली, यावेळी त्या ठिकाणी युवा सेनेचे राज्य कार्यकारणी सदस्य युवानेते मृत्युंजय संजय गायकवाड, शिवसेना जिल्हाप्रमुख ओमसिंह राजपूत,एडवोकेट उल्हासराव जाधव, रयत क्रांती जिल्हाप्रमुख तुषार काचकुरे,भाजपा युवा मोर्चा जिल्हाप्रमुख विनायक भाग्यवंत,माजी शिवसेना शहर प्रमुख मुन्नाजी बेंडवाल, शिवसेना शहरप्रमुख गजेंद्र दांदडे, एडवोकेट दि.दा पाटील,श्री कडाळे साहेब,माजी नगराध्यक्ष श्री विठ्ठलराव येवले,श्री खाचणे साहेब श्री तेजनकर साहेब,अजय पाटील, भोसले काका, बीटी राऊत, पवार सर, बबन नाना जाधव,माधव पाटील,भैय्यासाहेब भालके, फकीरा काका उबरहंडे, डॉक्टर पिंपरकर साहेब, राजेश पाठक, पद्मनाभ बाहेकर, एडवोकेट दळवी साहेब,चेतनदादा देशमुख,शिवसेना कार्याध्यक्ष आकाश दळवी, युवासेना शहरप्रमुख श्रीकांत गायकवाड,विजय जायभाये, नगरसेवक बाळासाहेब धुड, आशिष जाधव,अरविंद होंडे, दीपक सोनुने, मंदार बाहेकर, टोनीसिंग शेट्टी,चेतन देशमुख, धनंजय देव, वर्षाताई पाथरकर, स्मिताताई चेकेटकर,अलकाताई पाठक, वंदनाताई देव, कऱ्हाडे ताई,भोंडे ताई,मनोज यादव, उदयदादा देशपांडे,गोविंद खुमकर, किरण देशपांडे, सचिन देशलहरा,शाम पवार, योगेश परसे, सागर घट्टे, गजानन जोशी,सोहम झाल्टे,ज्ञानेश्वर खांडवे,सचिन कोठाळे यांच्यासह एकता नगर तसेच परिसरातील शिवसेना भाजपाचे मित्र पक्षाचे सर्व पदाधिकारी ते शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते....!

# ग्रामीण भागातील विद्यार्थी घेऊ लागले उत्तंग भरारी...



**जनसंचलन/ चिखली** तालुक्यातील मेरा खुर्द येथील जिल्हा परिषद केंद्रीय मराठी उच्च प्राथमिक शाळा मेरा खुर्द येथील विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक परीक्षेत उत्तुंग भरारी. जिल्हा परिषद केंद्रीय मराठी उच्च प्राथमिक शाळा येथील वर्ग आठ मध्ये १७ विद्यार्थी परीक्षेत बसले होते त्यापैकी १५ मुले एन एम एम एस परीक्षेत उत्तीर्ण झाले होते. या परीक्षेची मेरिट लिस्ट काल प्रकाशित झाली त्यामध्ये गुणवत्ता शिष्यवृत्तीत कुमारी प्रतीक्षा प्रल्हाद खरात विद्यार्थिनी शिष्यवृत्ती पात्र ठरली आहे. तर सारथी शिष्यवृत्ती साठी आठ विद्यार्थी पात्र ठरले आहे. त्यामध्ये शिवशंकर गोविंद सुसर, वेदांत वसंता शिंदे, चेतन गजानन काळे, ओम संतोष वाघमारे, पुष्कर समाधान वराडे कु. तनवी कैलास काळे, कु. प्रांजली संजय वाघमारे आणि कु.ऋतुजा दमुता वाघमारे हे विदयार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहे. तर कु. प्राची राजेश अवचार, कु पूजा दिपक उदार, कुमारी अनया सुधाकर गवई, कु. ईश्वरी सुनील दिलवाले , वैभव गोरे आणि गोपाल आवचार हे विद्यार्थी उत्तीर्ण होऊन अगदी १ ,२ मार्क कमी पडल्यामुळे शिष्यवृत्ती पात्र ठरले नाही हे सर्व यशस्वी विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद यांना देतात. ह्या सर्व विद्यार्थ्यांचे गावातील पालकाकडून कौतुक होत आहे तसेच मेरा खुर्द जिल्हा परिषद शाळेची चर्चा परिसरात विद्यार्थिनी घेतलेल्या उत्तंग भरारीमुळे घेतल्यामुळे सर्व परिसरात शाळेचे चर्चा होत आहे








दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

# मानव मुक्तीचे प्रणेते डॉ.बाबासाहेब आंबेडकर...



महान ज्ञानपिपासू, तत्वचिंतक ,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अर्थशास्त्रज्ञ , समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, विधिज्ञ , पत्रकार , शिक्षणतज्ज्ञ, संघटक ,वक्ते अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे महापुरुष म्हणजे परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय .बाबासाहेबांच्या विचारांचा त्यांनी तयार करून दिलेल्या मार्गाचा भारताच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे भारतीय अर्थ नीती , सिंचन नीती , शैक्षणिक धोरण , सामाजिक परिवर्तनासाठीचे विषयक धोरण , सामाजिक समरसतेसंदर्भातील धोरण या सर्व नीती आणि धोरणांच्या पायाभरणीवरच देश वाटचाल करीत आहे.डॉ बाबासाहेबआंबेडकरांनी स्वातंत्र्य , समता ,न्याय आणि सार्वभौमत्त्व या आधुनिक शाश्वत मूल्यांवर आधारित समतामूलक समाज रचनेच्या निर्मितीसाठी लढा दिला ; कारण समतामूलक समाजरचना ही उत्तम राष्ट्राच्या पायाभरणीसाठी आवश्यक आहे हे बाबासाहेबांना ज्ञात होते म्हणून केवळ एकाच समाजाचा विचार न करता त्यांनी राष्ट्रीय नवनिर्मितीचे स्वप्न पाहिले . खितपत असलेल्या समाजाला जागृत करून त्यांच्यामध्ये ,प्राण ओतला त्यांचे आत्मभान जागृत केले संघर्ष व लढा उभारून समतामूलक समाज रचनेच्या मूळ प्रवाहात आणून सोडले. १९४२ साली शेडयूल कास्ट फेडरेशनच्या अधिवेशनात वीस हजार महिलांना बाबासाहेबांनी आवाहन केले की,स्वच्छ राहा, दुर्गुणांपासून दूर राहा,तुमच्या मुलांना चांगले शिक्षण द्या,त्यांच्यामधील कमीपणाची भावना दूर करा,मी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे वागाल, तर तुम्ही स्वतःची तर प्रगती करालच त्याचबरोबर समाजालाही प्रगतीच्या मार्गावर घेऊन जाऊ शकाल. एवढे सांगून बाबासाहेब पुढे म्हणतात तुम्ही तर घरच्या साक्षात लक्ष्मी ! त्यामुळे घरात काही गोष्टअमंगल होणार नाही याची खबरदारी तुम्हाला घ्यायची आहे. सदाचरणा शिवाय घेतलेल्या शिक्षणाची किंमत शून्य असून चारित्र्य हेच धर्माचे महत्त्वाचे अंग आहे हे लक्षात घ्या.तथाकथीत उच्चभ्रूंना इतर जातीच्या लोकांनी जीवनभर अभिशापाच्या दलदलीत सडत राहायचे ,तिरस्काराचे जीवन जगायचे या वास्तविकतेची त्यांना घृणा आली होती .ही परिस्थिती बदलण्यासाठी बाबासाहेबांनी कायदा व राजकारणाचा मार्ग स्वीकारला.दलित ,पीडित, शोषितांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात परिवर्तनासाठी संघर्ष केला. हा संघर्ष होता समाजातीलअसमानता व विषमतेचा. त्यांच्या या संघर्षात समाजातील वंचित वर्गाची पीडा होती.त्यांच्या विषयीची कळकळ होती.समाजभावा बरोबरच ममभाव जोडला गेला पाहिजे .समभाव व ममभाव म्हणजेच समरसता. ही समरसता समाज रोगावर उत्तम औषध ठरू शकेल अशी बाबासाहेबांची भावना होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पेनात प्रचंड ताकद होती, विचारात विद्वत्ता होती,वाणीत प्रखरता होती आणि त्यांच्या कार्यात प्रचंड गती होती याचा पुरेपूर उपयोग बाबासाहेबांनी सर्वंकष समाजाला करून दिला. त्यांनी राज्यघटनेच्या पानापानात भारतीय समानतेची रुजवणूक करून येथील पददलित समाजाच्या, शोषितांच्या ,वंचितांच्या,अस्पृश्यांच्या, स्त्रियांच्या व मानवमुक्तीच्या कहाण्या बाबासाहेबांनी प्रकाशमान केलेल्या आहेत. बाबासाहेब अभ्यास करताना रात्री तीन वाजता त्यांचा रुममेट जागा झाला अन् म्हणाला मिस्टर आंबेडकर अभ्यास करायलाही काही मर्यादा असते अशाने तुम्ही नक्कीच आजारी पडाल बाबासाहेब क्षणभर पुस्तक बाजूला करीत म्हणाले मी येथे शिक्षणासाठी आलोय खरा पण माझा जीव भारतातच घुटमळलाय करोडो बांधव धर्म अन्य रूढीच्या नावाखाली माणुसकीपासून वंचित झाले त्यांच्या करता मानवी हक्कांचा लढा उभारायचा आहे असे म्हणून बाबासाहेब पुन्हा पुस्तक हाती घेऊन अभ्यासाला लागले. ङ्घ्ङ्घ शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो पिल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही हा शिक्षणाविषयीचा क्रांतिकारी मूलमंत्र बाबासाहेबांनी आम्हा अनुयायांना दिला. शिक्षणाशिवाय प्रगती नाही हा मोलाचा संदेश अंतिम माणून आमच्या अनुयायांनी शिक्षण घेतले परंतु त्या शिक्षणाचा फायदा समाजाच्या उपयोगासाठी झाला पाहिजे असे बाबासाहेबांचे स्वप्न होते.त्यावेळी शिक्षणाची सोय नसताना या महामानवाने शिक्षण घेऊन स्वत: बरोबरच इतरांना शिक्षणाची दारे उघडी करून दिली.आदिवासी व मागासवर्गीयांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले .वंचितांना घटनेच्या माध्यमातून आरक्षणाची तरतूद केली .सध्या आरक्षणाचा मुद्दा हा ऐरणीवर आला आहे .वास्तविकता मागासवर्गीयांना जीवनात स्थान मिळविण्यासाठी आरक्षण अतिशय महत्त्वाचे आहे आणि तो त्यांचा घटनादत्त अधिकार आहे .या अधिकारापासून वंचित व्हायचे नसेल तर बाबासाहेबांचा शिका ,संघटित व्हा व संघर्ष करा हा मूलमंत्र अंमलात आणणे गरजेचे आहे.प्रतिकूल परिस्थितीत एकाकी संघर्ष करून व्यवस्थेला झुकविण्याचे महान क्रांतिकारी कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहे.१९ व २० मार्च १९२७ ला महाडच्या तळ्याचा सत्याग्रह उभारून नैसर्गिक साधन संपत्तीवर सर्वांचा समान हक्क व अधिकार असला पाहिजे हे ठणकावून सांगितले .नंतर २५ डिसेंबर १९२७ ला महाड येथे मनुस्मृतीचे दहन केले .त्याच वेळी हिंदू धर्मियांना खूप समजावण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्यात बदल होत नाही हे लक्षात आल्यावर १३ ऑक्टोबर १९३५ ला येवला येथे मुक्कामी धर्मांतराची सिंहगर्जना केली.धर्मांतराच्या घोषणेनंतर चळवळीत एक महत्त्वाची घटना घडून आली ती म्हणजे ३१ मे १९३५ रोजी धर्मांतराविषयी संपूर्ण महार समाजाचे मनोगत जाणून घेण्याकरिता सभा बोलाविण्यात आली होती. अखिल मुंबई इलाखा महार परिषद या नावाने आयोजित या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मुक्ती कोन पथे? याविषयावर ऐतिहासिक भाषण झाले. धर्मांतराच्या सर्व पैलूंवर त्यांनी दिलेल्या या भाषणांचे संदर्भ सार्वकालिक आहेत . या भाषणाच्या शेवटी पुन्हा बाबासाहेबांनी तथागत बुद्धांचा उपदेश जनतेला सांगितला .बाबासाहेब म्हणतात,ङ्घ्ङ्घ या प्रसंगी तुम्हाला काय सांगावे याचा विचार करीत असताना भगवान बुद्धाने आपल्या भिक्खु संघात मरणापूर्वी जो उपदेश केला व ज्याचा महापरिनिर्वाण सुत्तात उल्लेख केलेला आहे याची मला आठवण होते .भगवान बुद्धांनी उत्तर दिले की, आनंदा, भिक्षू संघात मजपासून काय हवे आहे .आनंदा, मी आत बाहेर काही न ठेवता धर्मोपदेश केला आहे. त्यात तथागताने आचार्य सूची मुळीच ठेवली नाही, तर मग आनंदा तुम्ही दिव्याप्रमाणे प्रकाशमान व्हा ! पृथ्वीप्रमाणे परप्रकाशित राहू नका ! सत्याला धरून राहा !सत्याचाच आश्रय करा ! व दुसऱ्या कोणालाही शरण जाऊ नका ! मी देखील बुद्धाच्या शब्दांचा आश्रय करून तुम्हाला असा निरोप देतो की ,तुम्ही आपले आधार व्हा ! स्वत: च्या बुद्धीला शरण जा ! दुसऱ्या कोणाचेही उपदेश ऐकू नका! सत्याचा आधार घ्या .! सत्याला शरण जा! दुसऱ्या कशालाही शरण जाऊ नका ! हा भगवान बुध्दाचा उपदेश तुम्ही या प्रसंगी ध्यानात ठेवला तर माझी खात्री आहे की, तुमचा निर्णय चुकीचा होणार नाही.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चक्रवर्ती प्रियदर्शी सम्राट अशोकाच्या कार्याचे स्मरण भारतीयांना व्हावे म्हणून १४ ऑक्टोबर,१९५६ रोजी नागनदी काठी नागपूर येथे पूज्य भंते महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन जागतिक धम्म क्रांती केली .ही धम्मक्रांती म्हणजेच मानवमुक्तीचा अंतिम लढा होता त्यात बाबासाहेब पूर्णता यशस्वी झालेत. बुद्ध धर्म म्हणजे करुणासागर बाबासाहेबांनी व्यवस्थावाद्यांना दिलेले विवेकपूर्ण उत्तर आहे .या धर्मातून दलितांना नवे जीवन ,नवी सनद व नवी अस्मिता बहाल केली .मानवतावादी विचारांनी माणूस माणसाजवळ यायला मदत झाली .बौद्ध धर्मातील तत्त्वांच्या पायावर संविधान लिहून भारतीय भूमीत बुद्ध धम्माचा अध्याय नव्याने सुरू केला. तथागत बुद्धापूर्वी या जगात मानवतेची, मानवी स्वातंत्र्याची फार मोठी पोकळी होती ही पोकळी प्रज्ञावंत सम्यक संबुद्धाने भरून काढली .मानव- तेची संस्कृती जगाने स्वीकारून देशाच्या हिंसेच्या, अज्ञानाच्या नी अहंकाराच्या आगीत उभी असणारी माणसे बोधी वृक्षांच्या शीतल छायेखाली आली म्हणजेच प्रज्ञा- शील -करुणेच्या छायेखाली आली.

लेखीका
डॉ.सौ.मंजुश्री खोब्रागडे
कवी व साहित्यीक



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नांदुरा अर्बन बँक अपहारप्रकरणी आणखी एका आरोपीस केली अटक...

## १४ लाखांची रोकड जप्त अपहाराचा गुंता सुटण्याचे संकेत

जनसंचलन/ नांदुरा

येथील नांदुरा अर्बन बँकेच्या साडेपाच कोटी रुपयांच्या अपहारप्रकरणी आणखी एकास अटक करण्यात आली आहे. त्याच्या जवळून १४ लाखांची रोकड जप्त करण्यात आली आहे. त्यामुळे नांदुरा येथील अपहाराचा गुंता सुटण्याचे संकेत मिळत आहेत. नांदुरा अर्बन बँकेतील एका संगणक लिपिकाने क्रिकेट सट्ट्याच्या नादी लागून बँकेच्या खात्यातून साडेपाच कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम विविध ३६ खात्यांमध्ये ट्रान्सफर करून अपहार केला, अशी तक्रार बँक मॅनेजर राजेंद्र कुमार पांडे यांनी नांदुरा पोलिस स्टेशनला २८ मार्च रोजी दिली होती. या तक्रारीवरून नांदुरा पोलिसांनी तत्काळ संगणक लिपिक व मुख्य आरोपी असलेल्या प्रतीक शर्मा यास अटक केली. नांदुरा पोलिसांचा तपास सुरू असताना गुन्हे अन्वेषण शाखा बुलढाणा यांच्याकडे वर्ग झाले. दरम्यान, ११ एप्रिल रोजी नांदुरा येथील मोहन मधुकर घन यास एलसीबी पथकाने अटक केली. दरम्यान, बँकेने दिलेल्या तक्रारीनुसार ज्या ३६ खात्यांमध्ये रक्कम वर्ग झाली त्या ३६ खात्यांची नावासह पूर्ण माहिती पोलिसांना दिली आहे. मात्र, यापैकी इतर कोणालाही अद्याप अटक करण्यात आलेली नाही. दरम्यान, नांदुरा शहरात सुरू असलेल्या क्रिकेटच्या सट्ट्यावर हा कर्मचारी साडेपाच कोटी रुपये हरला. तो सट्टा जुबेर नामक बुकी चालवित असल्याचे समोर येत असून ज्यांच्या ज्यांच्या खात्यात ही रक्कम दिली. त्यातील बहुतांश खाती ही सट्टेबाज किंवा त्यांच्या ओळखी असलेल्यांची आहेत. तसेच, क्रिकेट सट्टेवाल्यांनी कोट्यवधी रुपयांची स्थावर मालमत्ता दुसऱ्याच्या नावावर विकत घेतल्याचेही समोर येत आहे. नांदुरा अर्बन बँकेतून ज्यांच्या खात्यात प्रचंड रक्कम वर्ग झाली त्यांची सर्वांची चौकशी होणे गरजेचे आहे.




# बुलढाण्यात सण उत्सवाच्या काळात बुलढाणा पोलिसांची मॉक ड्रिल..



जनसंचलन/बुलढाणा

आगामी काळात साजरे होणारे सण, उत्सव व निवडणुकांच्या काळात तेढ निर्माण होवून तणावपुर्ण परिस्थिती निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, गुन्हेगारांवर वचक राहावा, तसेच पोलीस हे नागरिकांचे जिवीताचे व मालमत्तेचे संरक्षणा करीता सजग व तयार आहे.. या करीता आज बुलढाणा पोलीस व दंगा काबु पथकाने बुलढाण्यातील जयस्तंभ चौकात मॉक ड्रिल करण्यात आली आहे..मॉक ड्रिल मध्ये बेकायदेशीर जमावावर आश्रुधुर नळकांड्या फोडणे, हॅन्ड ग्रेनाईट जमावावर फेकणे, गैरकायद्याच्या जमावातील जमाव भडकवणाऱ्या, लोकांना ताब्यात घेण्यात आले.. अशा सर्व कृतींचे प्रात्यक्षीक करण्यात आले.यावेळी बुलढाणा पोलीस उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील ,पोलीस निरीक्षक नरेंद्र ठाकरे ,सहायक पोलीस निरीक्षक निलेश लोधी,सहायक पोलीस निरीक्षक विकास तिडके यांच्यासह पथकातील अंमलदार व पोलीस कर्मचारी उपस्थित होते..



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## महायुतीचे अधिकृत उमेदवार भूमिपुत्र खासदार मा.प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ खामगाव येथे बैठक

### राजूर ता.मोताळा येथे बुलढाणा लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार मा.श्री.प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ रॅली



**जनसंचलन/ खामगाव**

आज खामगांव येथे अखिल भारतीय मराठा महासंघाचे माजी अध्यक्ष तथा जेष्ठ नेते श्री.रामदादा मोहिते यांच्या निवासस्थानी बुलडाणा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार भूमिपुत्र खासदार मा.प्रतापराव जाधव यांनी प्रचारार्थ सदिच्छा भेटी दिली. देशाचे यशस्वी प्रधानमंत्री मा.श्री. नरेंद्रजी मोदी साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी बुलडाणा लोकसभेचे महायुतीचे अधिकृत उमेदवार भूमिपुत्र खासदार मा.प्रतापराव जाधव यांचे येणाऱ्या दिवसात एकदिलाने व ताकदीने काम करूया महायुतीचा दणदणीत विजय खेचून आणूया असा विश्वास लोकप्रिय आमदार श्री.आकाशभाऊ फुंडकर यांनी याप्रसंगी व्यक्त केला. यावेळी महायुतीचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.मौजे राजुर ता.मोताळा येथे बुलढाणा लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार मा.श्री.प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ रॅली संपन्न झाली. व तसेच गावातील ग्रामस्थ बांधव व महायुतीचे कार्यकर्ते यांची संवाद साधला.देशाचे यशस्वी प्रधानमंत्री मा.श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी बुलडाणा लोकसभेचे महायुतीचे अधिकृत उमेदवार भूमिपुत्र खासदार मा.प्रतापराव जाधव यांचे येणाऱ्या दिवसात एकदिलाने व ताकदीने काम करूया महायुतीचा दणदणीत विजय खेचून आणूया असा विश्वास लोकप्रिय आमदार श्री.संजय गायकवाड यांनी याप्रसंगी व्यक्त केला.यावेळी महायुतीचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## सेवानिवृत्तिच्या डोहाळ्यावर अवैध रेती वाहतुकीची धूम प्रशासनाच्या नाकावर टीचुन वाळू वाहतूक...

**जनसंचलन/लोणार**

धूम स्टाइल ने शहरात वाळू वाहतूक वाहने सुसाट तालुक्यात अवैध वाळू उपसा करणारे वाहने शहरातील मुख्य वस्तीतून मोठ्या वेगाने सुसाट धावत आहेत. त्यातच शहरातील नागरिकांसह शालेय विद्यार्थी जीव मुठीत धरून वावरावे लागत आहे. मात्र वाहतुक पोलिस प्रशासन नुसती बघ्याची भूमिका घेत आहे. त्यामुळे वाळू माफियांना सुगीचे दिवस आले आहेत. यंदा पाऊस कमी झाल्याने मराठवाडयाती नदीचे पात्र पाण्याअभावी पूर्णपणे कोरडे ठाक पडले आहे. या ठिकाणाहून दिवसरात्र शंभराहून अधिक वाहनाच्या माध्यमातून खुलेआम वाळू उपसा केला जात आहे. ही वाहने लोणार शहरातील रस्त्यावर सुसाट वेगाने धावत आहेत. यावेळी नागरिकांना जीव मुठीत धरून आपली वाहने चालवावी लागतआहे. शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनात तर मोठे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मस्जिद चौक,पिंपळखुटा रोड, जुना पोस्ट ऑफिस रोड, सरकारी दवाखाना रोड, बस स्टँडचौक , धारचौक , अशा ठिकाणाहून ही अवैधरित्या वाहतूक करणारी वाहने सुसाट धावताना दिसतात. विशेष या वाहनावर कोणत्याही प्रकारचा नंबर नसून जवळपास चालक हे अल्पवयीन दिसून येत आहेत. शहरातील मुख्य रोडवर असणाऱ्या काही खाजगी रुग्णालयासमोरून सुद्धा हाच प्रकार घडत आहे. त्यामुळे शहरातून वाळू घेवून भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. पथके गायब, इलेक्शन सोने पे सुहागा.. प्रसाशना कडून वाळू माफिया वर कारवाई करण्यासाठी काही महिन्या आधी पथक तयार करण्यात आले होते. पण आज घडीला लोकसभा निवडणूक मध्ये पथकातील कर्मचारी



वर्ग व्यत असल्याचे सांगून करोडो रुपये चा महसूल बुडत आहे आहे. रात्री वेळी १० वाजेपासून सकाळी ६ वाजेपर्यंत अवैधवाळू माफियांच्या रात्रीचा खेळ सुरू आहे लोणार महसूल विभागाचा अधिकारी व कर्मचारी मुखसमती असल्यामुळे हा रेतीचा प्रकार खुलेआम सुरू आहे. ये पब्लिक है सब जानती है बाबू शहरातील अवैध वाळू वाहतूक संदर्भात नागरिकांमध्ये विविध चर्चा आये जवळपास ४०हजार प्रती गाडी वसुली केली जात असून पाच ते सहा गाड्यांना वरिष्ठांच्या आदेशाने असेच सोडले जात आये तर जवळपास १५ते२०गाड्या कडून वसुली केली जात आहे






# बनावट सही शिक्क्यासह पोलिसांचे ओळखपत्र देणाऱ्या त्या दोघांना पोलिसांनी केली अटक

**जनसंचलन/बुलढाणा**

पोलिसांची बनावट ओळखपत्र तयार करणाऱ्या शहरातील दोन फोटोग्राफर विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अधिक्षक कार्यालयातील वरिष्ठ श्रेणी लिपीक सुषमा संजय जाधव यांनी बुलढाणा शहर पोलिस स्टेशन मध्ये जमील शाह यासीम शाह (साई फोटो स्टुडीओ) कारंजा चौक, बुलढाणा आणि प्रशांत गायकवाड (भावना फोटो स्टुडीओ) कारंजा चौक, बुलढाणा यांच्या विरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुषमा जाधव यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्यांच्याकडे पोलीस विभागातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे ओळखपत्रासंबंधीचे काम आहे. बुलढाणा जिल्हा पोलीस पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी दिलेल्या लेखी विनंती अर्जावरुन दलातील त्यांचे पोलीस विभागाचे ओळखपत्र अधिकृत प्रेस मधुन तयार करुन कार्यालयाचे सही शिक्यानिशी सबंधीत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना रितसर पुरविण्यात येतात, दिनांक १२ एप्रिल २०२४ रोजी त्या पोलीस अधिक्षक कार्यालयात ड्युटीवर हजर असतांना त्यांना समजले की, बुलढाणा जिल्हा पोलीस काही पोलीस कर्मचारी यांना बुलढाणा कारंजा चौकातील साई फोटो घटकातील स्टुडीओ व यांना बनावट पोलीस ओळख पत्राबाबत माहीती दिली व खात्री करण्यासाठी साई फोटो स्टुडीओ व भावना फोटो स्टुडीओ येथे जावुन त्यांचे स्वतःचे ओळखपत्र बनवून आणण्यास पाठविले असता दत्ता जिते यांनी साई फोटो स्टुडीओ, कारंजा चौक, बुलढाणा येथे जावुन त्यांचे पोलीस ओखळपत्र घेवून दुपारी २ वाजता कार्यालयात आले व त्यांनी सांगीतले की, साई फोटो स्टुडीओचे मालक जमील शाह यासीन शाह यांनी १५० रुपयात त्यांचे स्टुडीओ मध्ये कॉम्प्युटरवर ओळखपत्र बनवुन दिले आहे. हे ओळखपत्र मी पाहीले असता ते पुर्णपणे बनावट असुन त्यावर असलेली स्वाक्षरी सुध्दा बनावट असल्याचे माझ्या निदर्शनास आले. दिनांक १२ एप्रिल रोजी दुपारी १ ते २ वाजताचे दरम्यान जमील शाह यासीम शाह, साई फोटो स्टुडीओ, कारंजा चौक, बुलढाणा यांनी पोलीस विभागाची कोणतीही परवानगी न घेता अनाधिकृतपणे स्वतःच्या आर्थीक फायद्यासाठी त्यांचे फोटो स्टुडीओ मध्ये कॉम्प्युटरवर पोलीस कर्मचारी दता जिते यांना त्यांचे पोलीस अधीक्षक यांच्या बनावट सहीचे बनावट पोलीस ओळखपत्र तयार करून दिले असुन यापूर्वी सुध्दा त्यांनी व प्रशांत भावना फोटो स्टुडीओ मधुन पोलीस अधीक्षक यांच्या बनावट सहीचे बनावट पोलीस ओळखपत्र बनवून दिले असुन आणखी काही बनावट पोलीस ओळखपत्र तयार करुन दिले जात आहेत, म्हणुन त्यांनी दिनांक १२ एप्रिल २०२४ रोजी दुपारी १ वाजता पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस कर्मचारी दत्ता जिते यांना बनावट पोलीस ओळख पत्रा बाबत माहिती दिली व खात्री करण्यासाठी साई फोटो स्टुडिओ व भावना फोटो स्टुडिओ येथे जाऊन त्यांचे स्वतःचे ओळखपत्र बनवून आणण्यास पाठवले असता दत्ताजी ते यांनी साई फोटो स्टुडिओ व कारंजा चौक बुलढाणा येथे जाऊन त्यांचे पोलीस ओळखपत्र देऊन दुपारी दोन वाजता कार्यालयात आले व त्यांनी सांगितले की साई फोटो स्टुडिओ चे मालक जमील शहा यासीन शहा यांनी १५० रुपयात त्यांचे स्टुडिओ मध्ये कॉम्पुटर द्वारे ओळखपत्र बनून दिले असता ते पूर्णपणे बनावट असून त्यांच्यावर असलेली स्वाक्षरी सुद्धा बनावट असल्याचे निदर्शनास आले. दिनांक १२ एप्रिल रोजी दुपारी एक ते दोन वाजेच्या सुमारास जमील शाहा यासीम शाह साई फोटो स्टुडिओ कारंजे चौक बुलढाणा यांनी पोलीस विभागाची कोणतीही परवानगी न घेता अनाधिकृतपणे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यांचे फोटो स्टुडिओ मध्ये कम्प्युटरवर पोलीस कर्मचारी दत्ताजी ते यांना त्यांची पोलिस अधीक्षक यांच्या बनावट सहीचे बनावट पोलीस ओळखपत्र तयार करून दिली असून यापूर्वी सुद्धा त्यांनी व प्रशांत गायकवाड भावना फोटो स्टुडिओ कारंजा चौक बुलढाणा यांनी पैसे घेऊन बरेच पोलीस कर्मचारी यांना बनावट पोलीस ओळखपत्र तयार करून देऊन पोलीस विभागाची फसवणूक केली आहे. जमील शाहा यासीम शाह व प्रशांत गायकवाड यांच्यावर कलम ४२० ४६५ ४६६ ३४ भादवी अंतर्गत बुलढाणा शहर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


